# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/05/2023 (सोमवार) दुपार

## मोटर सायकल चोरी करणारा आरोपी गजाआड

## —: पोलीस स्टेशन सावनेर नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक ०७/०५/२०२३ रोजी मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर ठाणेदार पोलीस स्टेशन सावनेर यांनी पोस्टे सावनेर अप क्र. ३००/२०२३ कलम ३७९, ३४ भांदवि. व अप क्र. २४७/२०२३ कलम ३७९, ३४ भांदवि. चे गुन्हयाचे तपास कामी नियुक्त केलेले डीबी पथक मधील पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश दोनोडे पोलीस हवालदार सुरेंद्र वासनिक, पोलीस नायक प्रकाश ठोके, निलेश तायडे, रवी मेश्राम, पोलीस शिपाई सचिन लोणारे, यांनी सदर गुन्हयात आरोपीचा शोध घेवुन **आरोपी नामे— राहुल उर्फ बाला दिलीप मडावी वय १९ वर्ष रा. चिचपुरा सावनेर** यांचे ताब्यातून गुन्हयात चोरी गेलेली १) होंडा शाईन मोटारसायकल क्र. एम. एच—४०/बी.व्ही.—५९८० किमती अंदाजे ११,०००/—रू. २) विना नंबरची एक बजाज प्लॅटीना काळया रंगाची मोटरसायकल किमती अंदाजे १०,०००/—रू. ३) एक काळया रंगाची होंडा लिव्हो कंपनीची मोटरसायकल ज्याचे मागील नंबर प्लेटवर क्र. एम.एच—४०/ए.एन—०८३३ किमती अंदाजे २०,०००/—रू. ४) एक काळया रंगाची होंडा शाईन मोटरसायकल क्र. आर. जे.—२५/एस.क्यु.— १४५९ किमती अंदाजे २०,०००/—रू. ५) एक लाल रंगाची होंडा सी. डी. डिलक्स मोटरसायकल क्र. एम.एच—३१/सी. डब्लयू— १४५२ किमती अंदाजे २५,०००/—रू. असा एकुण ८६,०००/—रूपयाचा मुद्देमाल पोस्टे सावनेर व पोस्टे खापा (अनु. क्र. ०३) या गुन्हयातील हस्तगत करण्यात आलेला आहे. व त्याचे इतर साथीदार फरार आहेत.



# मौदा येथील जुगार अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड

दिनांक ०७/०५/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक कन्हान उपविभागात गस्त करीत असतांना सदर पथकास गोपनीय बातमीदारां कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे मौदा हद्दीत माथनी कन्हान नदीच्या पुलाखाली काही इसम हे ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या माहीती प्रमाणे सदर पथकाने सापळा रचुन पंचांसह रेड केली असता एकुण ४ जुगारी इसम हे ५२ ताशपत्यांवर पैशाची बाजी लावुन अवैधरित्या पैशाचा हारजीतचा जुगार खेळत रंगेहाथ मिळुन आले. सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने एकुण ४ जुगार खेळणारे इसम नामे **१) राधेश्याम जियालाल पसेकर, वय ६० वर्ष २) संजय मुन्नाजी ईखार वय ३० वर्ष ३) शुभम अशोक मानेगुदे, वय २७ वर्ष ४) राधेश्याम वंसतराव भांडारकर, वय ३४ वर्ष सर्व रा. मौदा** यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ ताशपत्ते, नगदी ५३५०/—रू. हिरो स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच—४०/सी.जे— ५५४२ किंमती अंदाजे ५०,०००/—रू., ०८ नविन कार्डचे पाकीट ३२०/—रू., ०१ लोखंडी पेटी ५०/—रू. असा एकुण ५५७२०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. सदर जुगारी इसमांना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांचे विरूध्द कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला असुन पोलीस स्टेशन मौदा हे पुढील तपास करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक विरू नरड, मोनू शुक्ला यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर